# Washim District Police

**Nature of work** :- Arresting Gansters

**Police Station** :- Malegaon

**Date of Good Work Done: -** 27/07/2017

**Brief of the work done** :-

In the area of PS Malegaon Unknown accused used made road robbery their modus operandi is to stop victim Motor cycle and threatening by knife still cash, golden ornaments . A crime is registered at PS Malegaon Cr.no. 276/17 U/s 394 IPC

leader accused Named Prabhu alias Hanuman Tanaji Gore age 32 at Sonkhas, Pramod Kashiram maske age 32 At Wakad , Tukaram Hanuman Gore age 32 at Sonkhas, Sunil Suresh Kankal age 24 at Savargaon Barde, Kashinath Vishwanath Gore age 24 at Lakhala, Washim all are arrested from shegaon while persuading them. This gang also committed robberies, which was took place at Mangrulpir, Shirpur.

Then Under the Guidance of SP Mokshada Patil Mam and Addl SP Swapna Gore team led by LCB PI Dukare Patil after continuously searching them and taking help of Cyber experts of Washim police. The Team include API Salve, PSI Ingle, ASI Katade, PC Pradip Chavan, Nagare, Raju Rathod, Ravi Gharat, Prem Rathod, Swapnil Shelke, Kishor Khandare, Balaji Barve, DPC Milind Gaikwad, Also Cyber Expert PC Pradip Dakhor & Amol Kalmundale. this resulted into a good reaction among the people of district Washim.

**Image**:



## 'रोड रॉबरी' टोळी जेरबंद

◆ सहा आरोपींना केली सिनेस्टाईल अटक
◆ जिल्ह्यात तीन ठिकाणी केली वाटमारी
◆ आरोपींवर अन्य जिल्ह्यात गुन्हे दाखल
◆ स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

*तालुका प्रतिनिधी* / २६ जुलै

**वाशिम :** जिल्ह्यासह विविध जिल्ह्यात रस्त्यावर वाहनांना अडवून शस्त्राच्या धाकावर पैसा बळकावणाऱ्या टोळीस जेरबंद करण्यात येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आहे. सहा आरोपींच्या टोळीचा सिनेस्टाईल पाठलाग करून शेगाव येथे अटक करण्यात आली असून जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्याच्या मोहिमेला मोठे यश प्राप्त झाले आहे.

जिल्ह्यात चालू महिण्याचे पंधरवड्यात वाटमारी करणाऱ्या टोळीने अनेक ठिकाणी वाटमारी करून दहशत निर्माण केली होती. या टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांनी स्थागुशाचे पथक कार्यान्वित करून डिजीटल तंत्रज्ञानाचा आधार घेवून सदरहु टोळीचा पाठलाग पुणे जिल्ह्यातील चाकण, तळेगाव दामाडे व परिसरात करून शेवटी बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे टोळीतील गुन्हेगारांना अटक करण्यात यश मिळविले आहे.

सदरहु टोळीप्रमुख प्रभु उर्फ हनुमान तानाजी गोरे वय ३२ रा.सोनखास याचेसह प्रमोद काशीराम मुके वय ३२ रा.वाकद, तुकाराम हनुमान गोरे वय ३२ रा.सोनखास, सुनिल सुरेश कंकाळ वय २४ रा.सावरगाव बरडे, काशिनाथ विश्वनाथ गोरे वय २४ रा.लाखाळा वाशिम,नितीन वसंतराव हिवराळे वय २८ रा.लाखाळा वाशिम, यांना शेगाव मंदीर परिसरातून पाठलाग करून अटक करण्यात आली. सदरहु टोळीने मालेगाव, मंगरुळपीर, शिरपूर इत्यादी पो.स्टे.अंतर्गत दुखापत करून वाटमारीसारखे गंभीर गुन्हे केलेले आहेत. त्यांची या भागात दहशत असून त्यांनी चोरीसारखे प्रकार केलेले आहेत. परंतु तक्रारदार समोर आले नाहीत. यापूर्वी अटक करण्यात आलेला त्यांचा सहकारी रामेश्वर खंडारे रा.केशव नगर याने यापुर्वीच सदरहु टोळीची कबुली दिलेली आहे. सदरहु टोळीस जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांचे अधिपत्याखाली व अपर पोलिस अधीक्षक स्वप्ना गोरे, पोलिस निरीक्षक स्थागुशा प्रकाश डुकरे पाटील यांचे मार्गदर्शनात विशेष पथक प्रभारी सपोनि किरण साळवे, पोउपनि कैलास इंगळे, सपोउपनि कातडे, प्रदिप चव्हाण, नागरे, राजु राठोड, रवि घरत, प्रेम राठोड, स्वप्निल शेळके, किशोर खंडारे, बालाजी बर्वे, चालक मिलींद गायकवाड यांनी अटक करून कार्यवाही केली आहे. तसेच या पथकास सायबर सेलमधील पो.कॉं.प्रदिप डाखोरे व अमोल काळमुंदळे यांनी सहकार्य केले. जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांनी सक्रीय गुन्हेगार व गुन्हे करणाऱ्या टोळया यांचेविरुध्द विशेष मोहीम उघडून त्यांच्या हालचालींना आळा घालण्यासाठी विशेष पथक अधिक सक्रीय केले असून भविष्यात गुन्हेगारीवर अंकुश लावण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

Deshonnati News Paper 27 July 2017